MHPU090011552003

| | |
|---|---|
| दाखल तारीख | – १०/०७/२००३ |
| नोंदविल्याची तारीख | – १०/०७/२००३ |
| निकाल तारीख | – ०९/०६/२०२६ |
| कालावधी | – **२२व. १०म. २९दि.** |

**(भाग – अ)**

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात पिंपरी, पुणे

**(पिठासन अधिकारी :– श्रीमती टी.एस.महाडीक)**

**नि.फौ.ख.क्र.३४८/२००३**
**नि.क्र. २१**

**अभियोगपक्ष** – महाराष्ट्र शासन,
पोलीस स्टेशन अधिकारी,
चतुःश्रृंगी पोलीस ठाणे, पुणे
(गु.र.नं.२२६/२००२)

**अभियोगपक्षातर्फे** – सहाय्यक सरकारी अभियोक्ता – **श्रीमती पुजा काळे**

**–विरुध्द–**

**आरोपी** – **१. संतोष जगन्नाथ जगताप,**
वय :– ४५ वर्षे, धंदा :– व्यापार,
रा. मॉडेल कॉलनी, पुणे
**२. संजीव दत्तात्रय जगताप (मयत),**
**३. भुराराम ठकाजी चौधरी (फरार),**
वय :– ३० वर्षे, धंदा :– व्यापार,
रा. ताडीवाला रोड झोपडपट्टी, पुणे

**आरोपींतर्फे विधिज्ञ** – **श्री. पी.एल.जाधव**

**(भाग – ब)**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची तारीख** | दि.०७/०७/२००२ ते १०/०७/२००२ |
| **फिर्याद दिल्याची तारीख** | दि.१३/०७/२००२ |
| **दोषारोप पत्र दाखल तारीख** | दि.१०/०७/२००३ |
| **पुरावा सुरु झाल्याची तारीख** | दि.०६/०६/२०२६ |
| **न्यायनिर्णयासाठी प्रकरण ठेवल्याची तारीख** | दि.०९/०६/२०२६ |
| **न्यायनिर्णयाची तारीख** | दि.०९/०६/२०२६ |
| **आरोपींना शिक्षा ठोठावली असेल तर, त्याची तारीख** | निरंक |

**(आरोपींचे तपशील)**

| **अ.क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक तारीख** | **जामीनावर सोडल्याची तारीख** | **आरोपींवर ठेवलेले दोषारोप** | **आरोपींना निर्दोष किंवा दोषी ठरविल्याची तारीख** | **शिक्षा लादलेला असल्यास** | **शिक्षा वजावट केल्याचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संतोष जगन्नाथ जगताप | - | - | भा. दं. वि. का. क. ४४७, ४४८, ५०६ सह ३४ | ०९/०६ /२०२६ | – | – |

**(भाग – क)**

**(अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी)**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| ०१ | अमेय नंदकिशोर जगताप (फिर्यादीचा मुलगा) | नि.क्र.२० |

आरोपीतर्फे तोंडी व लेखी पुरावा देण्यात आलेला नाही.

# न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०९/०६/२०२६)

**०१.** प्रस्तुतच्या खटल्यामध्ये आरोपी हे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४४७, ४४८, ५०६ सह ३४ साठीच्या संपरिक्षेस सामोरे गेलेले आहेत.

**०२.** **अभियोगपक्षाचे घटनेविषयीचे कथन खालीलप्रमाणे आहे–**

दि.०७/०७/२०२२ रोजी ते दि.१०/०७/२००२ रोजीपर्यंत पिंपळे निलख, ता. हवेली, जि. पुणे येथील सर्वे न.२९+१/२+१/२+२/३/३/१ या फिर्यादी व साक्षीदार यांचे मालकीच्या जागेत नैऋत्य कोपऱ्यात आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांचे संमतीशिवाय त्यांच्या जागेत शिरुन १० x १२ चे दुकानाचे शेडचे शटरचे बेकायदेशीर बांधकाम केले व फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी केली. म्हणून फिर्यादीने आरोपींविरुध्द चतुःश्रृंगी पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली.

**०३.** फिर्यादीच्या तक्रारीवरुन गु.र.नं.२२६/२००२ नोंदविण्यात आला. ज्याचा तपास तपासी अंमलदार व्ही.बी.कदम, सहा. पोलीस निरीक्षक, चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन यांनी करुन, आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करणे इतपत पुरावा मिळून आल्याने, न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

**०४.** सदर प्रकरणात आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ८२ व ८३ प्रमाणे आरोपींविरुध्द जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला व

आरोपींविरुध्द स्टॅण्डींग एन.बी.डब्ल्यू काढण्यात आले. त्यानंतर आरोपी क्र.१ हे न्यायालयासमोर हजर झाले. आरोपी क्र.२ हे मयत आहेत. आरोपी क्र.१ यांनी आरोपी क्र.३ पासून सुनावणी वेगळी चालविण्याबाबत अर्ज दाखल केला. त्यानुसार आदेश होवून आरोपी क्र.३ याचेपासून आरोपी क्र.१ ची सुनावणी वेगळी चालविण्यात आली. आरोपी क्र.१ वरील दोषारोप आरोपीला वाचून व समजावून सांगितला, तो त्यांनी नाकबूल करुन, संपरीक्षेस सामोरे जाण्याची विनंती केल्याने आरोपी क्र.१ विरुध्द दोषारोप निश्चित करण्यात आला व आरोपी क्र.३ विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे त्याच्या गैरहजेरीमध्ये पुरावा नोंदविण्यात आला.

**०५.** आरोपींनी त्यांच्या विरुध्द खोटा गुन्हा दाखल केलेला आहे, असा बचाव घेतलेला आहे.

**०६.** आरोपींविरुध्दचे दोषारोप आणि अभीलेखावरील दस्ताऐवज यावरुन सदर प्रकरणाच्या न्यायनिवाडयाकामी खालील मुद्दे निश्चित करण्यात आले असून कारणमिमांसेअंती त्यावरील निष्कर्ष त्या मुद्दयांसमोर देण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | उत्तरे |
|---|---|---|
| ०१ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले का की, दि.०७/०७/२००२ रोजी ते दि.१०/०७/२००२ रोजी पर्यंतच्या कालावधीत मौजे पिंपळे निलख, ता. हवेली, जि. पुणे येथील सर्वे न. २९+१/२+१/२+२/३/३/१ या फिर्यादी व साक्षीदार यांचे मालकी जागेचे नैऋत्य कोपऱ्यात आरोपींनी संगनमताने फौजदारीपात्र अतिक्रमण केले व | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | त्याद्वारे गुन्हा केला ? | |
| ०२ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले का की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांच्या मालकी जागेत अतिक्रमण करुन १० x १२ चे दुकानाचे शेडचे शटरचे बेकायदेशीर बांधकाम केले व त्याद्वारे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ०३ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले का की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी करुन धमकी दिली व त्याद्वारे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ०४ | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

०७. सदर प्रकरणामध्ये, अभियोगपक्षातर्फे, आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरिता केवळ एकमेव साक्षीदार तपासण्यात आला.

### मुद्दा क्र.०१ ते ०३ करिता

०८. सदरचे सर्व मुद्दे हे एकमेकांवर अवलंबून असल्याने कारणमिमांसेची पुनरार्वत्ती टाळण्याकरता त्यांना एकत्रीत घेण्यात येत आहे.

०९. प्रस्तुत प्रकरणात मूळ फिर्यादी हे मयत आहेत. अभियोगपक्षातर्फे मूळ फिर्यादी यांचा मुलगा अमेय नंदकिशोर जगताप (सा.क्र.१) यांना नि.२० वर तपासण्यात आलेले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासात आरोपींविरुध्द पुरावाच नोंदविलेला नाही. याउलट, फिर्यादी हे त्यांचे वडील असून ते सन

२०१२ मध्ये मयत झाले आहेत. त्यांच्या वडीलांनी त्यांच्या जागेमध्ये जे अतिक्रमण झाले हाते त्या संदर्भात तक्रार दाखल केली होती. सदरची जागा आता साक्षीदार क्र.१ च्या ताब्यात आहे व त्यांना आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नाही तसेच घटनेबाबत काही आठवत नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराचा अभियोग पक्षाच्यावतीने उलटतपास घेण्यात आला त्यातही त्याने आरोपीविरुध्द पुरावा नोंदविलेला नाही.

**१०.** न्यायपटलावर आलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता, यातील साक्षीदाराने त्याच्या सरतपासात आरोपींविरुध्द पुरावाच नोंदविलेला नाही. याकामी मुख्य साक्षीदार हे स्वतः फिर्यादी आहेत व ते मयत आहेत. तसेच इतर साक्षीदारांचा अढळ होत नसलेबाबतचा अहवाल याकामी आलेला आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फिर्यादीचा मुलगा यांची साक्ष नोंदवलेली आहे, त्यांनीही अभियोगपक्षास सहाय्य होईल असे कथन केलेले नाही. फिर्यादी हे प्रस्तुत प्रकरणात मुख्य साक्षीदार आहेत व त्यांचा पुरावा ते मयत असल्याने याकामी नोंदविला गेला नाही. याकामी आरोपींनी फिर्यादी यांच्या जागेत अतिक्रमण करुन बांधकाम केले याबाबत पुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपींनी गुन्हा केला आहे हे शाबित करण्याकरता कोणताही पुरावा अभिलेखावर आला नसल्याने त्याचा फायदा आरोपी क्र.१ यांस देण्यात येवून त्याची निर्दोष मुक्तता करण्यात येते. आरोपी क्र.३ यांच्या गैरहजेरीत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ नुसार पुरावा नोंदविण्यात आला. आरोपी क्र.३ याचेविरुध्दही कोणताही पुरावा अभिलेखावर आला नसल्याने त्याची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. परिणामी, मुद्दा क्र. ०१ ते ०३ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत असून, मुद्दा क्र.०४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| **०१** | आरोपी **क्र.१ संतोष दत्तात्रय जगताप** यांची सदर खटल्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४४७, ४४८, ५०६ सह ३४ प्रमाणेच्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **०२** | फरारी आरोपी **क्र.३ भुराराम ठकाजी चौधरी** यांची सदर खटल्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४४७, ४४८, ५०६ सह ३४ प्रमाणेच्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **०३** | आरोपींचे जामीन कदबे रद्द करण्यात येत असून, जामीनदाराचा जामीन जामीन–जोखीम संपविण्यात येत आहे. |
| **०४** | फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ प्रमाणे अपील कालावधी पुढील सहा महीन्याकरता आरोपींनी वैयक्तिक व जामीनदाराचा प्रत्येकी रु.१५,०००/– (रुपये पंधरा हजार मात्र) जातमुचलका सादर करावा. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात संगणकावर टंकलिखीत व घोषीत करण्यात आला.)**

TEJASWINI SANDEEP MAHADIK
Digitally signed by TEJASWINI SANDEEP MAHADIK
Date: 2026.06.09 17:46:09 +0530

(टी.एस.महाडिक)

दि.०९/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग

पिंपरी पिंपरी न्यायालय, पुणे

**CERTIFICATE**

I affirms that the contents of this P.D.F file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Mrs. N.K.Vaidya |
| Court Name | : | Smt. T. S. Mahadik, 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pimpri, Pune |
| Date of order | : | 09/06/2026 |
| Order signed by P.O. on | : | 09/06/2026 |
| Order uploaded on | : | 09/06/2026 |